23 SEP 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान-तंत्रज्ञानाची सांगड आवश्यक

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधकांना भाषा विषयातून समाजशास्त्राचे अनेक स्त्रोत सापडतात. समाजात काय घडते याचा संबंध समाजशास्त्राबरोबर भाषेलाही जोडला गेला आहे. त्यामुळे संशोधकाने चाकोरीच्या बाहेर जावून भाषा, विज्ञान व तंत्रज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. सवते-सुबे पाडल्याने अडचणीत आलेली भाषा व समाजशास्त्र जगविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची सांगड घालणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरू यांनी केले.



कोल्हापूर : संशोधन पेपरचे पुस्तक प्रकाशन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाल गुरू. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सुनिलकुमार लवटे, चेअरमन मानसिंग बोंद्रे, विजयराव बोंद्रे, डॉ. राजेखान शानेदिवान, डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. विजय देठे आदी.

दसरा चौकातील श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या शहाजी छत्रपती महाविद्यालयातील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषक म्हणून ते बोलत होते. 'समकालीन संदर्भात सामाजिक शास्त्रे आणि भाषेतील समस्या व आव्हाने' हा या परिषदेचा विषय होता. अध्यक्षस्थानी डॉ. वासंती रासम होत्या. संशोधन पेपरचे पुस्तक प्रकाशन करण्यात आले.

डॉ. गोपाळ गुरू म्हणाले, समाजशास्त्र, राज्यशास्त्र समजून घेण्यासाठी भाषेचा अभ्यास केला पाहिजे. मानवी मूल्ये व शिक्षण एखाद्या चित्रपटाच्या संहितेप्रमाणे आहे. मानवाला बदलण्याचे काम भाषा व समाजशास्त्र करते. सामाज शास्त्रांकडे दुर्लक्ष झाले तर आपण आपली मूल्ये गमावून बसू. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्राचा अभ्यास केला तर समाजशास्त्रातील विविध विषयांना स्पर्श होतो. त्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले पाहिजेत. भाषा विषयांचे प्राध्यापकच राज्यशास्त्रावर चांगले लिखाण आणि भाष्य करताना दिसतात. त्यामुळे राज्यशास्त्र व भाषा विषयातील प्राध्यापकांनी एकमेकाशी संवाद साधून समाजोपयोगी संशोधन केले पाहिजे. पुर्वी महिलांना ज्ञान घेण्याची परवानगी नव्हती. आता मात्र तंत्रज्ञानामुळे माहितीचा खजिना सर्वांसाठीच खुला झाला आहे. त्यामुळे ज्ञानावर कोणाचीही मक्तेदारी राहिलेली नाही. मात्र, या खजिन्यातून काय घ्यायचे हे आपण ठरविले पाहीजे.

**ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरू यांचे प्रतिपादन**

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शर्के म्हणाले, तंत्रज्ञान ही अत्यावश्यक बाब आहे. शिक्षक आणि संशोधकांनी कॉपी पेस्टच्या नादी लागू नये. त्यामुळे आपली क्रियाशीलता कमी होते.

दुसऱ्या सत्रात डॉ. सुनिलकुमार लवटे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डी. ए. देसाई अध्यक्षस्थानी होते. तिसऱ्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. अवनिश पाटील होते. संशोधकांनी संशोधन निबंधाचे वाचन केले. डॉ. भारती पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला. प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवान अध्यक्षस्थानी होते.

यावेळी संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव विजयराव बोंद्रे, नैरोबी मोझेस, इराणचे वर्गा मोकलेसी, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. परिषदेचे समन्वयक डॉ. राहुल मांडणीकर, सहसमन्वयक डॉ. विजय देठे, डॉ. एन. एस. जाधव, डॉ. एस. जी. राक्षसे, डॉ. डी. एल. काशीद उपस्थित होते.